# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 30/03/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक 29/03/2021 चे 12.30 वा. ते 14.00 वा. दरम्यान पो. स्टे. खापरखेडा येथील महिला पोलिस कर्मचारी/सर तर्फे फिर्यादी हि सोबतचे पोलीस स्टाफ सह मिळालेल्या माहिती प्रमाणे आरोपी 1) विक्की देवीदास चंद्रीकापुरे, वय 32 वर्ष याची पत्नी 2) स्वाती विक्की चंद्रीकापुरे वय 27 वर्ष, व 3) गौतम चंद्रीकापुरे वय 28 वर्ष, सर्व रा. कुचक मोहल्ला पिपळा डागबंगला खापरखेडा यांच्या घरी अवैध दारूची कार्यवाही करणेकामी गेले होते. त्यादरम्यान आरोपी क्र 1 व 2 हे कार्यवाही करण्यास अडथळा करून फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ केली व आरोपी क्र 3 याने हात पकडुन ओडताळ करून पोलीस वर्दी वरील लाईनयार्ड, नेमप्लेट तोंडावरील लावलेला मास्क तोडुन विनयभंग करून शासकीय कामा मध्ये अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 353, 354, 332, 294, 34 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र 1 व 2 यांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मनोज मेश्राम 9423115260 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 2 कि.मी. मौजा खापरखेडा ते पारशिवनी रोड शेगावकर यांचे शेता जवळ येथे दिनांक 29/03/2021 चे 01:30 वा. ते 04.00 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील नामे– रवी शिवाजी गोडघाटे, वय 58 वर्ष, रा. नागपुर हे त्यांच्या एम.एच– 49/पी– 3054 क्रमांकाची होंडा ट्रिगर कंपनीच्या मोटरसायकलने खापरखेडा ते पारशिवनी जात होते. त्यादरम्यान अज्ञात वाहान चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिल्याने मोटरसायकल स्वार रवी गोडघाटे यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविंद्र विक्की रवी गोडघाटे वय 32 वर्ष रा. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि नागुलवार मो.न. 9923372647 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर